# जलसंपदा विभाग

**अधीक्षक अभियंता (दरवाजे) यांचे कार्यालय**

मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व परिमंडळीय अधिकारी, नाशिक परिमंडळ,
दिंडोरी रोड, नाशिक-422 004 दूरध्वनी (परिमंडळ) : 0253 2534466

महाराष्ट्र शासन

E-mail : nasikzone_wrd@yahoo.co.in


**जा.क्र.मसंसं(द)/परिमंडळ/प्रलि/ २६६ /सन २०२५** **दिनांक :०९/ ०५ /२०२५**

ई-मेल द्वारे

प्रति,

**१. अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
नाशिक**

**२. अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
जळगांव**

**विषय :- दप्तर कारकूर (गट क) / कालवा निरिक्षक (गट क) / मोजणीदार (गट क) या पदावर जलसंपदा विभागांतर्गत नामनिर्देशनाने प्रतिक्षायादी मधील तात्पुरती नियुक्ती करिता शिफारस करणेबाबत.**

**संदर्भ :-**
१. महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२२/ प्र.क्र.३४९ /आस्था (अतांत्रिक) दिनांकः २७.०१.२०२३
२. शासन जलसंपदा विभागाचे पत्र क्र. संकीर्ण २०२२/ प्र.क्र.३४९/आस्था (अतांत्रिक) दिनांक :- ०३.०४.२०२३
३. महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाचे https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर नाशिक परिमंडळाची दि.२६.८.२०२४ रोजीची शुध्दीपत्रक क्र.३ अन्वये प्रसिध्द झालेली दप्तर कारकून/कालवा निरिक्षक/मोजणीदार पदांची प्रतिक्षाधिन यादी.
४. अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक आपले कार्यालयाची रिक्त पदानुसार मागणी पत्र जा.क्र/आ-२/११८९/सन २०२५ दि.२८.०२.२०२५
५. अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगांव आपले कार्यालयाची रिक्त पदानुसार मागणी पत्र जा.क्र./आ-१/९९२/सन २०२५ दि.०३/०४/२०२५ व जा.क्र/आ-१/१०४०/सन २०२५ दि.०९.०४.२०२५
६. समन्वय समिती, तथा अधीक्षक अभियंता दक्षता पथक,मुंबई परिमंडळ,पाटबंधारे विभाग, ठाणे यांचे शिफारस जा.क्र/दप/पमं/सरळसेवा/समन्वय समिती/मेज-२ /२०६ दि.७/५/२०२५

१. उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय क्र. १ च्या अन्वये स्थापित समन्वय समितीव्दारे संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये जलसंपदा विभागांर्तगतची भुतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट ब (अराजपत्रित) गट क संवर्गातील नामनिर्देशानाच्या कोट्यातील १४ संवर्गाची एकूण ४४९७ रिक्त पदे सरळसेवेने भरणेबाबत दिलेल्या शासन मान्यतेनुसार सरळसेवा भरती प्रक्रिया राबवणेत आली आहे.

२. उपरोक्त भरती प्रक्रिये अंतर्गतची सर्व कार्यवाही पूर्ण करून संवर्गनिहाय उमेदवारांची शिफारस यादी व प्रतिक्षायादी शासनाचे www.wrd.maharashtra.gov.in संकेतस्थळावर दि. २६ ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच याबाबत आवश्यक ते प्रमाणे शुध्दीपत्रक ही प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

३. संदर्भ क्र. ६ अन्वये प्रतिक्षायादी मधील नियुक्तीसाठी शिफारस केलेल्या उमेदवारांची सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय शिफारसयादी समन्वय समिती यांचेमार्फत पुढील नियुक्ती विषयक कार्यवाही नाशिक परिमंडळाला प्राप्त झाली आहे.

४. तरी,संदर्भ क्र.४,व ५ चे मागणीनुसार व संदर्भ क्र.२ अन्वये भरतीसाठीच्या पदाच्या मंजुरीनुसार, भरती प्रक्रियेमध्ये उपलब्ध व शिफारस प्राप्त उमेदवारांना संदर्भ क्र.३ अन्वये प्रसिध्द सुधारीत प्रतिक्षाधिन यादीचे अनुसरुन सोबतचे प्रपत्र-२ नुसार **दप्तर कारकूर (गट क) / कालवा निरिक्षक (गट क) / मोजणीदार (गट-क) एस-६:१९९००-६३२००** या वेतनश्रेणीत त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या मंडळातील रिक्त पदावर खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून नियुक्तीसाठी शिफारस करण्यात येत आहे.

५. उमेदवारांचे नियुक्ती व सविस्तर पदस्थापना आदेश निर्गमित करणेपूर्वी मंडळाने व त्यानुसार उमदेवारांना रुजु करुन घेणेपूर्वी संबंधीत विभागाने खालीलप्रमाणे मूळ प्रमाणपत्रे तपासून घ्यावीत व नंतरच नियुक्ती संदर्भात कार्यवाही करावी.

१. **वयोमर्यादा** (दि.२४.११.२०२३ रोजी म्हणजेच अर्ज दाखल करणेच्या अंतिम दिनांकास)

१.१ वयाच्या दाखल्यासाठी शाळा सोडल्याचा दाखला / माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र / जन्मदाखला तपासावे.

१.२ उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे पूर्ण व खुल्याप्रवर्गासाठी वय ३८ वर्षे मागासवगीय उमेदवारासाठी ४३ वर्षे

१.३ अंशकालीन उमेदवारांसाठी -५५ वर्षे

१.४ अनाथ प्रवर्गासाठी -४३ वर्षे

१.५ खेळाडू उमेदवारांसाठी-४३ वर्षे

१.६ प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी -४३ वर्षे

१.७ दिव्यांग / दिव्यांग माजीसैनिक-४५ वर्षे

१.८ माजी सैनिक सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे इतकी वयोमर्यादेत सुट

तथापि, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय सनिव २०२३/प्र.क्र/१४/कार्या ९२ दि.०३ मार्च २०२३ अन्वये दि. ३१ डिसेंबर २०२३ पुर्वी प्रसिध्द होणाऱ्या भरती जाहिराती करिता कमाल वयोमर्यादेच्या दोन वर्षे शिथिलता दिलेली असल्याने वर नमूद सर्व प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादेच्या दोन वर्षे इतकी शिथिलता असेल.

२. **किमान शैक्षणिक अर्हता** :-

१. दप्तर कारकूर (गट क) / कालवा निरिक्षक (गट क) / मोजणीदार (गट क) या पदाकरिता जलसंपदा विभाग, अधिसुचना दि. २९ फेब्रुवारी २०१६ नुसार खालील प्रमाणे किमान शैक्षणिक अर्हता आवश्यक आहे.

२. ज्यांनी कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केली आहे तसेच

३. टंकलेखनाची शासकीय व्यावसायिक प्रमाणपत्र परीक्षा ३० शब्द प्रति मिनिट मराठी किंवा ४० शब्द प्रति मिनिट इंग्रजी उत्तीर्ण केली आहे.

**टंकलेखन अर्हता धारण करण्यातून तात्पुरती सूट** :-

१.दिव्यांग उमेदवाराने विहित टंकलेखन अर्हतेचे प्रमाणपत्र धारण केलेले नसेल तर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. अपंग-२०१६/प्र.क्र.११६/१६-अ, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ नुसार टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे दिव्यांग आरक्षणाचा दावा करणाऱ्या पात्र उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

२. माजी सैनिक वर्गातून अर्ज करण्यास पात्र असलेल्या उमेदवारांनी विहित टंकलेखन अर्हता धारण केली नसेल अशा उमेदवारास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण २०१८/ प्र.क्र.१८०/२८ दिनांक १३ जून २०१९ अन्वये त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचाकालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे माजी सैनिक आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

३. अनाथ उमेदवाराने विहित टंकलेखन अर्हतेचे प्रमाणपत्र धारण केलेले नसेल तर शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक अनाथ-२०२२/प्र.क्र.८४/१ का-०३, दिनांक ०७ जुलै, २०२२ नुसार टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून 2 वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे अनाथ आरक्षणाचा दावा करणाऱ्या पात्र उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

४. प्रकल्पग्रस्त वर्गातून अर्ज करण्यास पात्र असलेल्या उमेदवारांनी विहित टकलेखन अर्हता धारण केली नसेल अशा उमेदवारास शासन निर्णय, सा.प्र. विभाग, संकीर्ण-१११४/प्र.क्र.२००/१६-अ दि.०४.०९.२०१५ अन्वये त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षांचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे प्रकल्पग्रस्त आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

५. भूकंपग्रस्त वर्गातून अर्ज करण्यास पात्र असलेल्या उमेदवारांनी विहित टंकलेखन अर्हता धारण केली नसेल अशा उमेदवारास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, संकीर्ण-१११४ /प्र.क्र.२००/१६ अ दिनांक ४ सप्टेंबर २०१५, अन्वये त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे भूंकपग्रस्त आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

६. पदवीधर अंशकालीन कर्मचारी वर्गातून अर्ज करण्यास पात्र असलेल्या उमेदवारांनी विहित टंकलेखन अर्हता धारण केली नसेल अशा उमेदवारास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग संकीर्ण- १११४/प्र.क्र.२००/१६-अ, दिनांक ४ सप्टेंबर, २०१५ अन्वये त्याच्या नियुक्तीच्या दिनांका पासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

ज्या दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त व पदवीधर अंशकालीन उमेदवारांकडे टंखलेखनाची शासकीय व्यावसायिक प्रमाणपत्र परीक्षा ३० शब्द प्रति मिनिट मराठी किंवा ४० शब्द प्रतिमिनिट इंग्रजी प्रमाणपत्र नाही त्यांना नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या कालावधीत व २ संधीत सदर प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे अन्यथा प्रचलित शासन नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

३. **अधिवास प्रमाणपत्र** :-

उमेदवार हा महाराष्ट्रातील रहीवासी असावा. तहसिलदार / कार्यकारी दंडाधिकारी / उपविभागीय दंडाधिकारी किंवा त्यापेक्षा उच्च अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र असावे.

तसेच १) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. टिईएम २०१०/(११० /१०) / तांशि-४. दिनांक १३ जून २०११.

२) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. रिपम/प्र.क्र.६६/२०११/ई.१०, दि.२७ जून २०११ नुसार कार्यवाही करावी.

४. **उन्नत व प्रगत मोडत नसलेबाबतचे प्रमाणपत्र तपासणी** :-

" महाराष्ट्र राज्य लोक सेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, (विमुक्तजाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम G.८)" हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि.२९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगतगटात (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज. (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासप्रवर्ग, खुल्या गटातील महिला व खेळाडू यांना लागू आहे. इतर मागास बहुजन विकास विभाग, शासन शुद्धिपत्रक दि. १७ फेब्रुवारी २०२३ नुसार

उमेदवाराकडे ३१ मार्च २०२४ अखेर वैध असणारे उन्नत व प्रगत गटात मोडत नसले बाबत प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. शासन, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग परिपत्रक क्र. सीबीसी १०/२००६/प्र.क्र.१५/ मायक ५. दि.५.६.२००६ अन्वये दिलेल्या नमुन्या नुसार प्रमाणपत्र असावे.

तथापि शासन महिला व बालविकास विभाग निर्णय क्र. महिआ २०२३/ प्र.क्र.१२३/कार्या-२ दिनांक ४ मे २०२३ अन्वये खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करण्यात आलेली आहे.

तसेच शालेय शिक्षण क्रीडा विभाग, शुध्दी पत्रक क्रमांकः राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ नुसार खेळाडू आरक्षणाकरिता उन्नत व प्रगत गटात मोडत नसले बाबतची गरज नाही.

५. **जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र :-**

१) शासन निर्णय विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग, क्रमांक-सीबीसी १२/२००२/२५२/प्रक्र-१/इमाव-५, दि.२५ जानेवारी २०००

२) शासन निर्णय क्र. सीबीसी-१०/२००३/प्र.क्र.९१/ मावक-५, दि.८ डिसेंबर २००३

३) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. सीबीसी - १०/२००३/प्र.क्र.९१/मावक-५, दि. २८ जानेवारी २००४

४) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग परिपत्रक क्र. सीबीसी - १०/२००४/ प्र.क्र.५७०/मावक-५. दि.५ मार्च २००५

५) म. शा. जलसंपदा विभागाचे पत्र क. जापप्र-२०१२/ (१५७/२०१२)/आ (वर्ग-२), दिनांकः- २६ डिसेबर, २०१२

६) म.शा.सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र. बीसीसी-२०१२/प्र.क्र. ३३२/१२/१६-ब, दिनांक १८ में २०१३

७) म.शा. सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क. बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब, दि.३० जुलै २०१३ नुसार जात वैधता प्रमाणपत्र सादर करणेबाबत मार्गदर्शक तत्वे व सूचना देण्यात आलेल्या आहेत त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या पदांवरील नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकःबीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२.१२.२०११ मधील तरतूदीनुसार जात वैधता प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून करण्यात येत आहे. सदरहू उमेदवाराकडे जात पडताळणी समितीकडून प्राप्त करुन घेतलेले जात वैधता प्रमाणपत्र असल्यास त्याने नियुक्तीसाठी हजर होताना ते सादर करणे आवश्यक आहे. जातपडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणेही संबंधित उमेदवाराची जबाबदारी असल्यामुळे वैधता प्रमाणपत्र नसल्यास उमेदवाराने जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे संबंधित अधीक्षक अभियंता यांना तसेच जात प्रमाणपत्र पडताळणी समितीस विहीत अर्ज व कार्यपध्दती नुसार सादर करणे आवश्यक राहील.

मागासवर्गीय उमेदवारांचे जाती दावे (जातप्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र) संचालक, समाजकल्याण संचालनालय, पुणे यांच्याकडून अथवा संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समिती व जमातीचे दावे (जातप्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संख्या. पुणे यांच्याकडून अथवा संबंधित जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून सदर आदेश निर्गमित झाल्यापासून ६ महिन्याच्या आत तपासून घ्यावेत. विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधित उमेदवाराच्या सेवा प्रचलित नियमानुसार समाप्त करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

६. **माजी सैनिक आरक्षण :-**

माजी सैनिकांच्या आरक्षित कोटयातून पात्र होण्यासाठीची आवश्यक सर्व अर्हता मूळ कागद पत्रे व उमेदवाराने नोंदणी झालेल्या जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे माजी सैनिक म्हणून नागरी सेवेस पात्रता धारण करीत असल्याचे प्रमाणपत्र, **Govt. of Maharashtra General Administrative Dept. Circular No.RTA.** 1079/0/482/**XVI-A, Mantralaya Bombay-**400032 **dtd** 16 **the April** 1981 नुसार तपासणी करावी. तसेच शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक आरटीए १०८२/३५०२/सीआर- १००/१६-अ दिनांक २ सप्टेंबर १९८३ नुसार व शासन निर्णय, क्रमांकः- संकीर्ण-२०१४/(प्र.क.३६४/१४)/२८ दि. ०३ जुन २०१६ नुसार राज्य शासनाच्या नागरी सेवेत प्रथमतः रुजू होताना त्यावेळी त्याने ज्या विविध पदांसाठी अर्ज केलेले आहेत, त्याबाबतची दिनांक निहाय सविस्तर माहिती स्वतःच्या स्वाक्षरीने लेखी स्वयंघोषणा पत्राच्या स्वरुपात संबंधीत नियुक्ती प्राधिकाऱ्यास देणे आवश्यक आहे. सदर स्वयंघोषणा पत्रात माजी सैनिकाने त्याने अर्ज केलेल्या ज्या विविध पदांचा उल्लेख आहे, केवळ त्या पदापैकीच कोणत्याही पदावर त्याची निवड झाल्यास, जर त्या सरळसेवा भरतीस माजी सैनिकासाठीच्या समांतर आरक्षणाचे तत्व लागू असेल तरच त्यास माजी सैनिकासाठीच्या सवलतीचा फायदा घेता येईल, स्वंयघोषणापत्रात नमूद नसलेल्या पदांच्या बाबतीत त्यास सवलतीचा फायदा अनुज्ञेय राहणार नाही, याची संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

माजी सैनिकांना सेवेत नागरी सेवेतील पदावर नियुक्तीसाठी देण्यात येणाऱ्या सवलतीचा त्यांनी एकदा फायदा घेतल्यावर नागरी सेवेतील पदावर नेमणुकीसाठी दुसऱ्यांदा तसा फायदा घेता येणार नाही. तसेच संबंधीत कार्यालय प्रमुखांनी माजी सैनिक उमेदवारास हजर करून घेताना त्यांना संरक्षण दलातून कार्यमुक्त केल्याची खातरजमा करावी.

७. **अंशकालीन कर्मचारी :-**

शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक पअंक-१००९ /प्र.क्र . २०७ / २००९/१६-अ दि.२७ ऑक्टोंबर २००९ व क्रमांक अशंका १९१३/प्र.क्र.५७/२०१३/१६-अ दिनांक १९ सप्टेंबर २०१३ नुसार शासकीय कार्यालयामध्ये ०३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या उमेदवाराने सदरच्या अनुभवाची रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये नोंद केलेली असणे आवश्यक राहील. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्याची त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील मुळ प्रमाणपत्र व तहसिलदार यांचेकडील प्रमाणपत्र कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

पदवीधर अंशकालीन उमेदवाराच्या प्रमाणपत्राबाबतची सत्यता पडताळणी बाबत प्रमाणपत्र वित्तरीत केलेल्या संबंधीत तहसिलदार महसूल विभाग यांना परिमंडळाकडून स्वतंत्रपणे कळविणेत आले नाही. तरी त्याचे वैधतेबाबत प्रमाणपत्र उपलब्ध झालेनंतरच उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करावेत.

८. **खेळाडु आरक्षण :**

खेळाडूंसाठी राखीव असलेल्या पदावरील नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांकः राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२. दिनांक १.७.२०१६, रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच, दिनांक १८.०८.२०१६ रोजीच्या शुध्दी पत्रकातील तरतूदी नुसार, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १७१७/प्र.क्र.३९ / क्रीयुसे-२. दिनांक १७.०३.२०१७, शासन निर्णय दिनांक २७.०३.२०१७, शासन शुध्दीपत्रक क्रमांकः राक्रीधो २००२/प्र.क्र.६८/क्रीयुरो-२. दिनांक १०.१०.२०१७, व शासन शुध्दीपत्रक दिनांक १५.११.२०१७ तसेच शासन निर्णय क्र.संकीर्ण १७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२. दिनांक ३०.०६.२०२२ मधील तरतूदीनुसार आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार दप्तर कारकूर (गट क) / कालवा निरिक्षक (गट क) / मोजणीदार (गट क) पदांसाठी निश्चित केलेली क्रीडाविषयक अर्हता व क्रीडा प्रमाणपत्र, परीक्षेच्या अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेला म्हणजे दिनांक २४.११.२०२३ रोजी किंवा तत्पूर्वी धारण करणे आवश्यक राहील. तसेच त्या

संदर्भातील सबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी बाबतचा अहवाल नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक राहील. सदर क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल तपासूनच संबंधित उमेदवाराच्या दप्तर कारकूर (गट क) / कालवा निरिक्षक (गट क) / मोजणीदार (गट क) या पदावर नियुक्ती देण्यात यावी.

आयुक्त, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना खेळाडू प्रमाणपत्र पडताळणी अहवाल प्राप्त करुन देणेबाबत परिमंडळाने संबंधितांना स्वतंत्रपणे कळविले नाही. तरी त्यानुसार वैधतेबाबत विहित प्रमाणपत्र उपलब्ध झालेनंतरच उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करावेत.

९. **दिव्यांग आरक्षण** :-

दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची प्रमाणपत्रे वैद्यकीय मंडळाकडून तपासून घेण्याच्या अधीन राहून त्यांची शिफारस करण्यात आलेली आहे. तसेच सा.प्र.वि. शा.नि. क्र. अपंग १००३/प्र.क्र.११२७/ २२००३/१६-अ, दिनांक ०६.०५.२००४ मधील बाब क्र. (६) नुसार त्यांच्या नेमणुकीपूर्वी उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा नाही याची वैद्यकीय मंडळाकडून तपासणी केल्यानंतर ते नेमणुकीस पात्र ठरतील. दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः अप्रकि २०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ०६.१०.२०१२ मधील आदेशानुसार SADM या नवीन संगणक प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः अप्रवि २०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६,दि.१४.०९.२०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swaviambancard.gov.in या संगणकीय प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले नवीन नमुन्यातील किमान ४०% कायमस्वरुपी दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी सादर करणे अनिवार्य राहील. तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णयक्र. दिव्यांग-२०१८/प्र.क्र.११४/१६अं, दिनांक २९ मे, २०१९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार आरक्षणा संदर्भातील कार्यवाही करण्यात यावी. तसेच खाली नमूद करण्यात आलेल्या शासन निर्णय /परिपत्रकांमधील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

अ) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकः अपंग १००३/प्र.क.११२७/२००३/१६-अ. दि.०६.०५.२००४

ब) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन नि.क्र. न्यायाप्र.२००९/प्र.क्र.९/सुधार-३, दि.०३.०८.२०१०

क) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शा.परि.क्र.अपंग २००९/प्र.क्र.१३३/सुधार-३. दि.१४.०१.२०११

ड) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक अप्रकि २०१२/प्र.क्र.२९७/ आरोग्य-६, दि.०६.१०.२०१२

खेळाडू व दिव्यांग प्रवर्गातील पात्र उमेदवारांची जेष्ठता महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील तरतूदीनुसार करण्यात येईल.

अपंगत्व प्रमाणपत्राची सत्यता पडताळणीबाबत तसेच पदासाठी वैद्यकियदृष्टया सक्षम असलेबाबत वैद्यकिय तपासणीसाठी शिफारस झालेल्या दिव्यांग उमेदवाराचे बाबत संबंधित जिल्ह्याच्या वैद्यकिय मंडळांना परिमंडळ स्तरावरुन स्वतंत्रपणे कळविणेत आले नाही. तरी सर्व आवश्यक प्रमाणपत्रे उपलब्ध झालेनंतरच संबधित उमेदवारांची नियुक्ती विषयक कार्यवाही करावी.

१०. **अनाथ आरक्षण** :

अनाथासाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवाराला अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात शिफारस देण्यात येत आहे. नियुक्तीपश्चात ६ महिन्याच्या कालावधीत अनाथप्रमाणपत्राची पडताळणी करून घेण्याची जबाबदारी

संबंधित अधीक्षक अभियंता व आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांची राहील. अनाथासाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवाराला नियुक्ती देतांना महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णय / परिपत्रक दि.०२.०४.२०१८, दि.२३.०८.२०२१, दि.२६.११.२०२१, दि.०६.०४.२०२३ व दि. १०.०५.२०२३ मधील अटी व शर्ती / मार्गदर्शक सूचनानुसार तसेच या संदर्भातशासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

११. **प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षण:**

शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अ दिनांक २१ जानेवारी १९८० नुसार कुटूंबातील एखादया व्यक्तीला नोकरी मिळाल्यानतर सदर दाखल्याची नोकरी विषयक परिणाम कारकतारह करण्यात यावी. प्रकल्पग्रस्त व्यक्तीला किंवा तिच्यावर अवलंबून असणा- या व्यक्तीला सदर दाखल्याच्या आधारे नोकरी दिल्यानंतर, नोकरी दिल्याबाबतची माहिती संबंधीत जिल्हाधिका-यांकडे तसेच संबंधीत जिल्हयाच्या सेवायोजन कार्यालयाकडे पाठविण्याबाबत संबंधीत अधीक्षक अभियंता यांनी दक्षता घ्यावी. प्रकल्पग्रस्त उमेदवाराच्या दाखल्याबाबतची सत्यता पडताळणी बाबत, प्रमाणपत्र वितरीत केलेल्या संबधीत जिल्हाधिकारी कार्यालय/पुनर्वसन शाखा यांना परिमंडळ स्तरावरुन स्वतंत्रपणे कळविणेत आले नाही. तरी वैधतेबाबत विहित प्रमाणपत्र प्राप्त झालेनंरतच उमेदवारांची नियुक्ती विषयक कार्यवाही करावी.

१२. **भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षणः**

शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक भूकंप- १००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ दिनांक २७ ऑगस्ट २००९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार निवड झालेल्या भूकंपग्रस्त उमेदवाराचे मुळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांचे कार्यालयाकडून पडताळणी करुन घेतले जाईल. सदर पडताळणी अंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबाबतची कार्यवाही संबंधीत अधीक्षक अभियंता यांनी करावी.

भूकंपग्रस्त उमेदवाराच्या दाखल्याबाबतची सत्यता पडताळणी बाबत दाखला वितरीत केलेल्या संबंधीत जिल्हाधिकारी कार्यालय (पुर्नवसन शाखा) यांना परिमंडळाकडून स्वतंत्रपणे कळविणेत आले नाही. तरी त्यानुसार वैद्यतेबाबत विहित प्रमाणपत्र उपलब्ध झालेनंतरच उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करावेत.

१३. उमेदवारांना कामावर रुजू करुन घेणेपूर्वी संबंधित उमेदवाराचे नियुक्ती पात्रतेच्या संबंधात मूळ कागद पत्रावरून शहानिशा करून घेतल्यावरच, पूर्ण खात्री झाल्यावरच संबंधित उमेदवारास कामावर रुजू करुन घेण्यांत यावे.

१४. सदरची नियुक्ती ही महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई औरंगाबाद अथवा अन्य न्यायाधिकरणात दाखल झालेल्या / होणाऱ्या याचिकेचे न्याय निर्णयाचे अधिन राहून करण्यात आली आहे. सदर शिफारस ही मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, छत्रपती संभाजीनगर येथे दाखल याचिका क्र.४८३/२०२४ यांच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

१५. **अन्य सर्वसाधारण सुचना:- (नियुक्ती आदेशामध्ये समाविष्ट करणेसाठी)**

१५.१ नियुक्ती प्राधिकारी यांनी आदेश काढलेनंतर उमेदवारांनी त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत तात्काळ रुजू होणे आवश्यक राहील. सदर विहित कालावधीत उमेदवार रुजू झाला/झाली नाहीतर तो/ती नोकरीची संधी गमावेल व त्याच्या नियुक्ती करिता विचार करण्यात येऊ नये. संबंधीत उमेदवार सदर पदावरील नियुक्ती स्विकारण्यास इच्छुक नाहीत, असे गृहित धरण्यात येईल व त्यांचे नियुक्तीचे आदेश आपोआप रद्द होतील, सेवेत कार्यरत असलेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत त्यांना संरक्षण दलातून कार्यमुक्त केल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत हजर होणे क्रमप्राप्त आहे.

१५.२ सेवेत रुजू होताना उमेदवाराने त्यांच्या वर्तणुकीबाबत स्थानिक प्रतिष्ठीत (लोकप्रतिनिधी / ग्रामपंचायत / नगरपंचायत / मुख्याध्यापक / राजपत्रित अधिकारी इ.) व्यक्तीकडून दोन वेगवेगळी प्रमाणपत्रे सादर करावीत.

१५.३ उमेदवाराच्या रुजु होण्याच्या मुदतवाढीच्या विनंती संदर्भात सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र नागरीसेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली-२०२१ शासन अधिसूचना क्रमांक एसआरव्ही २०१६/प्र.क्र.२८१/१२, दिनांक २१.०६.२०२१ मधील तरतूदी नुसार तसेच या बाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१५.४ एखाद्या उमेदवारास विहित कालावधीत अपरिहार्य, उचित कारणास्तव रुजू होण्यासाठी मुदतवाढ हवी असल्यास त्या उमेदवारांनी सविस्तर नियुक्ती आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांच्या संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांना मुदतवाढीसाठी अर्ज सादर करणे आवश्यक राहील. तद्नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेणेत येऊ नयेत. उचित कारणास्तव विहित कालावधीत मुदतवाढीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना मुदतवाढ देण्याचा / नाकारण्याचा अंतिम निर्णय संबधीत नियुक्ती प्राधिका-याचा राहील.

१५.५ उमेदवाराची ज्येष्ठता ही सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१.०६.२०२१ रोजीच्या शासन अधिसूचना अन्वये विनियमित केलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियम २०२१ मधील तरतुदीनुसार गुणवत्ता क्रमांकानुसार निश्चित करण्यात येईल. त्यामुळे नियुक्ती च्या आदेशानुसार ३० दिवसाच्या आत सेवेत रुजू न होणाऱ्या उमेदवाराला सेवा ज्येष्ठता गमवावी लागेल व त्यांची ज्येष्ठता ते ज्या दिनांकास शासन सेवेत रुजू होतील त्या दिनांकास निश्चित करण्यात येईल.

१५.६ इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास कल्याण विभागाच्या शासन निर्णय क्रमांकः सीबीसी-२०२०/प्र.क्र.१८/मावक, दि.३१/०१/२०२० नुसार खुल्या प्रवर्गातील महिला, विजा, भज, इमाव व विमाप्र, या प्रवर्गातील प्रगत व उन्नत गटात सामाविष्ट नसलेल्या व्यक्तिना सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेल्या NCL प्रमाणपत्राच्या वैधता पडताळणीसाठी राज्यातील प्रादेशिक महसूली विभागस्तरावर"विभागीय आयुक्त" यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समिती कडून NCL प्रमाणपत्राची (उत्पनाच्यादाखल्याची) तपासणीअंती वैध ठरण्याच्या अटीच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती करण्यात यावी.

शासन महिला व बालविकास विभाग निर्णय क्र. महिआ २०२३/ प्र.क्र.१२३/कार्या-२ दिनांक ४ मे २०२३ अन्वये खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करण्यात आलेली आहे.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांचे उन्नत व प्रगत गटात (क्रिमिलेअर) मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-यांनी दिलेल्या नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्राची वैधता संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांनी उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार तपासुन घेण्याची कार्यवाही करावी.

उमदेवारांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रमाणपत्राच्या सत्यासत्यते बाबतचा अहवाल संबंधित समितीकडून शासनास प्राप्त होण्याच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे.

१५.७ उमेदवारांनी हिंदी व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केली नसेल किंवा सदर भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर यासंबंधी असलेल्या नियमानुसार भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. भाषा परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांची वेतनवाढ प्रचलित नियमाप्रमाणे रोखून ठेवण्यात यावी.

१५.८ ज्या मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील पदावर शिफारस करण्यात आली असेल त्या उमेदवारांबाबत समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः सीबीसी-

१०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५, दि.१६.०५.२००७ मधील सुचनेनुसार कार्यवाही करण्यात येईल.

**१५.९** नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या उमेदवाराकडे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांका प्रशिक्षण२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दि.१९.०३.२००३ मधील तरतुदीनुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत 'C.C.C.' किंवा 'O' स्तर किंवा 'B' किंवा 'C' स्तरपैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र या पैकी एक प्रमाणपत्र किया माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाच्या शासन निर्णय क्रमांकः मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४.०२.२०१३ व शासन पूरक पत्र दि. ०८.०१.२०१८ मध्ये नमूद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता आवश्यक आहे. तथापि, नियुक्ती स्विकारण्याच्या वेळेस सदर प्रमाणपत्र / अर्हता उमेदवारांकडे नसल्यास नियुक्ती स्विकारल्या पासून दोन वर्षाच्या आत उमेदवाराने उपरोक्त शासन निर्णयातील नमूद संस्थेचे संगणक ज्ञानाच्या अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. या विहित कालावधीत उमेदवाराने सदर प्रमाणपत्र सादर न केल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही २०१७ /प्र.क्र.४६२/कार्या. १२. दि.२८.०५.२०१८ तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

**१५.१०** प्रस्तुत उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारसही त्यांच्या पूर्व चारित्र्याची पडताळणी करण्यापूर्वी करण्यात येत असल्यामुळे सहा महिन्याचे आत उमेदवाराचे त्याचे पूर्व चारित्र्या संबंधीत सक्षम पोलीस अधिकाऱ्याकडून पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. चारित्र्य पडताळणी अहवाल प्रतिकूल आढळल्यास त्याची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल. उमेदवारांच्या चारित्र्य पडताळणीची कार्यवाही सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३ /२०१७/११६-अ,दि.२८.०८.२०१७ मधील तरतूदीनुसार करण्यात यावी. तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक चापअ १००८/प्र.क्र.२१४/०८ /१६-अ, दिनांक ०९.०१.२००९ व सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्र. चापअ ११०२/प्र.क्र.६३/१६-अ. दिनांक २६.८.२०१४ मधील सूचना देखील विचारात घेण्यात याव्यात.

**१५.११** उमेदवारांनी संबंधित वैद्यकीय मंडळांकडून वैद्यकीय तपासणी अहवाल महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती नियम) १९८१ मधील नियम ११ (१) अन्वये नियुक्ती होण्यापूर्वी किंवा नियुक्तीच्या तारखेपासून त्याची सहा महिन्याची सेवा पूर्ण होण्यापूर्वी. या पैकी जे अगोदर घडेल त्याप्रमाणे वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल करणे बंधन कारक राहील. सहा महिन्यांच्या आत वैद्यकीय तपासणी अहवाल प्राप्त न झाल्यास सदर उमेदवारांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. तसेच. वैद्यकीय तपासणी अहवाल असमाधानकारक असल्यास त्याची नियुक्ती कोणतेही कारण न देता १ (एक) महिन्याची नोटीस देऊन समाप्त करण्यात यावी.

**१५.१२** **(अ)** शासन निर्णय वित्त विभाग क्र. अनियो-१००५/१२६/सेवा-४ दि.३१.१०.०५ नुसार दि.१.११.०५ रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंश राशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेले सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही. तसेच वरिल सर्व अटी मान्य असल्याचे लेखी अभिवेदन नियुक्तीचे वेळी सादर करणे बंधनकारक आहे. तथापि, शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक अंनियो-१००९/प्र.क्र.३२/सेवा-४, दिनांक १८/०८/२००९ मधील तरतुदी नुसार दि.०१/११/२००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांनी त्याच किंवा अन्य विभागातील

निवृत्ती वेतन आस्थापनेच्या पदावरील नियुक्तीसाठी दि.०१/११/२००५ पूर्वी किंवा त्यानंतर अर्ज केला असेल आणि त्याला दि.०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नविन पदावर नियुक्त करण्यात आले असेल तर अशा प्रकरणी शासन परीपत्रक, वित्त विभाग क्रमांकः अनियो-१००६/८७/सेवा-४ दि.१२/०१/२००७ मधील (i) ते (iv) येथे नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता झाल्यास संबंधित शासकीय कर्मचा-यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहील.

(**ब**) शासन निर्णय वित्त विभाग क्र. रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४ दि.३१.०३.२०२३ नुसार परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागू करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णनुसार नियुक्ती पासुन ८ दिवसाच्या आत परिच्छेद क्र.४ प्रमाणे विकल्प देणे आवश्यक राहील.

**१५.१३** उमेदवाराने दप्तर कारकूर (गट क) / कालवा निरिक्षक (गट क) / मोजणीदार (गट क) या पदासाठी विहित केलेली विभागीय परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**१५.१४** उमेदवाराने कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास तसेच त्याचे काम किंवा वर्तणूक अयोग्य अथया असमाधानकारक आढळल्यास, तो सेवेतून कमी करण्यास पात्र ठरेल.

**१५.१५** सदर नियुक्ती उमेदवाराने सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या सत्यासत्यतेवर अवलंबून राहील. उमेदवाराने सादर केलेली प्रमाणपत्रे तसेच सांक्षाकन नमुन्यात नमूद केलेली माहिती नियुक्ती नंतर खोटी अथवा बनावट आढळल्यास उमेदवाराची नियुक्ती ताबडतोब संपुष्टात येईल. उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे चुकीची किंवा अवैध आढळून आल्यास त्यानुषंगाने होणाऱ्या कार्यवाहीस ते स्वतः जबाबदार राहतील.

**१५.१६** उमेदवाराने साक्षांकन नमुन्यात सादर केलेली माहिति नियुक्ती देण्यात आल्यानंतर असत्य असल्याचे आढळून आल्यास उपरोक्त नियुक्ती आदेश रद्दबादल करुन भारतीय दंड संहितेनुसार फौजदारी कारवाई करून सदर उमेदवाराला शासन सेवेत कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल.

**१५.१७** उमेदवाराच्या सेवानिवृत्तीचे वय प्रचलित नियमानुसार राहील.

**१५.१८** उमेदवार सेवेत रुजू झाल्यानंतर सेवेचा राजीनामा देऊ इच्छित असल्यास, त्याला शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दिनांक ०२/१२/१९९७ मधील तरतूदीनुसार शासनाला किमान १ (एक) महिन्याची आगाऊ नोटीस किंवा एक महिन्याचे मूळ वेतन देणे आवश्यक राहील. मात्र, गैरशिस्त, सेवानियमांचा भंग इत्यादी कारणांसाठी एखाद्या उमेदवाराची सेवा समाप्त करण्यासाठी वरीलप्रमाणे नोटीस देण्याचे बंधन शासनावर असणार नाही.

**१५.१९** उमेदवार सध्या केंद्र / राज्य शासनाच्या सेवेत अथवा निमशासकीय सेवेत कार्यरत असतील तर संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी त्यांना नेमणूकीच्या ठिकाणी सेवेत कार्यरत असतील तर संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी त्यांना नेमणूकीच्या ठिकाणी हजर होण्याच्या दृष्टीने सदर सेवेतून कार्यमुक्त झाल्याचे अथवा तसे लेखीपत्र सादर केल्याशिवाय त्यांना रुजू करुन घेता येणार नाही. तसेच उमेदवारांची नियुक्ती त्यांचे केंद्र / राज्य शासनाच्या सेवेत अथवा निमशासकीय सेवेतील ना-चौकशी प्रमाणपत्र त्यांच्या संबंधित कार्यालया कडून प्राप्त होण्याच्या अधिन राहील.

**१५.२०** उमेदवार ज्या दिवशी रुजू होतील त्या दिवसापासून नियमाप्रमाणे त्यांचे गोपनीय अहवाल लिहिण्यात यावेत व बदली झाल्यास ते संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे पाठविण्यात यावेत.

**१५.२१** मंडळात / परिमंडळात आकृतीबंधानुसार अगर आढाव्या अंती कार्यरत संवर्गात अतिरिक्त ठरल्यास समावेशनाबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यांत येईल.

१५.२२ शासन सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दि.०१.०७.२००५ अन्वये विवाहीत उमेदवारास लहान कुटूंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र लिहून सादर करणे बंधनकारक राहिल.

१५.२३ सदरची नियुक्तीही म.ना.से. (वर्तणूक) नियम १९७९ म.ना.से. (शिस्तवअपील) १९७९ व इतर शासकिय नियमांच्या अधीन राहील, तसेच या नियमांमध्ये वेळोवेळी होणारे बदल व दुरुस्त्या लागू असतील.

१५.२४ उपरोक्त आदेशामधील सर्व अटीचे मी काळजीपूर्वक वाचन केले आहे. आदेशातील सर्व अटी माल मान्य आहेत प्रकारचे पत्र संबंधीत उमेदवारास कामावर रुजू होण्यापूर्वी १००/-रुपयाच्या स्टॅम्पवर लिहून द्यावे लागेल व त्यानंतरच त्याला कामावर रुजू होता येईल.

१५.२५ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क. एसआरव्हीर २०१६/प्र.क्र.५०१/कार्या-१२ दि.१५.०५.२०१९ नुसार, उमदेवारास नियुक्ती होणाऱ्या परिमंडळात नियुक्तीनंतर ५ वर्ष सेवा करणे बंधनकारक आहे. नियुक्तीनंतर ५ वर्षात अन्य परिमंडळांत बदली करण्यात येणार नाही.

१५.२६ उमेदवाराने नियुक्तीच्या पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न होता विशिष्ट विकाणी पदस्थापना / नियुक्ती मिळविण्यासाठी मा. लोकप्रतिनिधी/ खाजगी व्यक्ती किंवा संघटना यांचे मार्फत दडपण दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास, संबंधित उमेदवारांविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतूदीनुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.

१६. आपले कार्यालयाकडील प्राप्त माहितीनुसार सदरची शिफारस देणेत येत आहे. तसेच सरळसेवा भरती २०२३ चे प्रसिध्द जाहीरातीनुसार रिक्त बिंदू व पदसंख्या यामध्ये बदल संभवत असल्यास सदर शिफारस परिमंडळास परत करावी.

१७. सदर पदांचे बाबतीत शासनाचे www.wrd.maharashtra.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या अंतिम यादी (नियुक्तीसाठी शिफारस केलेल्या उमेदवारांची यादी/प्रतिक्षाधीन यादी/अपात्र उमेदवारांची यादी ) व अनुषंगीक शुध्दीपत्रका मध्ये नमुद सर्व सुचना नियुक्तीसाठी लागु राहतील.

१८. उपरोक्त व्यतिरिक्त सदर पदाचे नियुक्तीसाठी शासनाचे इतर प्रचलित अटी, शर्ती व नियम लागू राहतील याची संबंधीत नियुक्ती प्राधीकारी यांनी दक्षता घेणेची आहे.

१९. दप्तर कारकूर (गट क) / कालवा निरिक्षक (गट क) / मोजणीदार (गट क) या पदासाठी सरळसेवा २०२३ भरती बाबत दाखल सर्व न्यायालयीन प्रकरणाचे निकालाचे अधिन राहून सदरची नियुक्ती शिफारस देणेत येत आहे.

**सोबत**:- उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस यादी

**(प्र.रा.पाटील)**
अधीक्षक अभियंता (दरवाजे)
मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व
परिमंडळीय अधिकारी, नाशिक परिमंडळ,
दिंडोरी रोड, नाशिक

**प्रत**:- सदस्य सचिव, समन्वय समिती, गट-क सरळसेवा भरती तथा अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी दक्षता पथक, मुंबई परिमंडळ, ठाणे यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

**प्रत**:- संबंधित उमेदवारांस ई-मेल द्वारे रवाना

# महाराष्ट्र शासन
## जलसंपदा विभाग
### समन्वय समिती
### गट-ब (अराजपत्रित) व गट-क सरळसेवा भरती २०२३
प्रपत्र-२

**सरळसेवा भरती सन २०२३ मधील नियुक्तिसाठी शिफारस करण्यात आलेल्या परंतु कागदपत्रे पडताळणीसाठी हजर न राहिलेल्या / नियुक्ति नाकारत असलेबाबत निवेदन वा राजीनामा सादर केलेल्या / नियुक्ति रद्द करण्यात आलेले उमेदवारांचे ऐवजी प्रतीक्षाधीन यादीतुन नियुक्त करावयाचे उमेदवारांची मंडळ निहाय यादी**

(नाशिक परिमंडळ कार्यालयाचे पत्र जा.क्र.मसंसं(द)/परि/प्रलि/२६८/२०२५ दि.०९.०५.२०२५ चे सहपत्र)

**परिमंडळाचे नांव :- अधीक्षक अभियंता (दरवाजे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व परिमंडळीय अधिकारी, नाशिक.**

**पदाचे नांव :- दफ्तर कारकुन (Daftar Karkoon)**

| Sr. No | Merit No | Candidate Full Name | Gender | Reservation caste category | Claimed Horizontal Reservation | Marks Obtained | Waiting Category | Selection Category | Recommended Circle |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 79 | SAMADHAN SHANKAR MALI | Male | Other Backward Class (OBC) | General | 172.44839 | WL-Open-GEN-8 / WL-Other Backward Class (OBC)-GEN-8 | Open-GEN Against PT | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |
| 2 | 404 | RUCHA LILADHAR NARKHEDE | Female | Other Backward Class (OBC) | Female | 161.44362 | WL-Open-LDS-12 / WL-Other Backward Class (OBC)-LDS-5 | Open-LDS | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |
| 3 | 459 | RAJESH SANJAY RAUT | Male | Schedule Tribe (ST) | General | 159.86523 | WL-Schedule Tribe (ST)-GEN-8 | Schedule Tribe (ST)-GEN | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |
| 4 | 962 | SHILPA UTTAM NILLAWAD | Female | Schedule Tribe (ST) | Female | 151.93048 | WL-Schedule Tribe (ST)-LDS-3 | Schedule Tribe (ST)-LDS | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |
| 5 | 1025 | ATUL BAPURAO PATIL | Male | Other Backward Class (OBC) | Ex-Sevicemen | 150.77847 | WL-Open-EX-7 | Open-EX | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगांव |

(प्र. रा. पाटील)
सदस्य
समन्वय समिती तथा
अधीक्षक अभियंता (दरवाजे)
मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व
परिमंडळीय अधिकारी, नाशिक परिमंडळ,
नाशिक

# महाराष्ट्र शासन
## जलसंपदा विभाग
### समन्वय समिती
### गट-ब (अराजपत्रित) व गट-क सरळसेवा भरती २०२३
प्रपत्र-२

**सरळसेवा भरती सन २०२३ मधील नियुक्तिसाठी शिफारस करण्यात आलेल्या परंतु कागदपत्रे पडताळणीसाठी हजर न राहिलेल्या / नियुक्ति नाकारत असलेबाबत निवेदन वा राजीनामा सादर केलेल्या / नियुक्ति रद्द करण्यात आलेले उमेदवारांचे ऐवजी प्रतीक्षाधीन यादीतुन नियुक्त करावयाचे उमेदवारांची मंडळ निहाय यादी**

(नाशिक परिमंडळ कार्यालयाचे पत्र जा.क्र.मसंसं(द)/परि/प्रलि/२६९/२०२५ दि.०९.०५.२०२५ चे सहपत्र)

**परिमंडळाचे नांव :- अधीक्षक अभियंता (दरवाजे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व परिमंडळीय अधिकारी, नाशिक.**

**पदाचे नांव :- मोजणीदार (Measurer)**

| Sr. No | Merit No | Candidate Full Name | Gender | Reservation caste category | Claimed Horizontal Reservation | Marks Obtained | Waiting Category | Selection Category | Recommended Circle |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 129 | AMOL SUDHAKAR GAWALI | Male | Special Backward Class (SBC) | General | 169.23932 | WL-Special Backward Class (SBC)-GEN-5 | Special Backward Class (SBC)-GEN | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |
| 2 | 142 | RAHUL DATTATRAY LAMBE | Male | Economically Weaker Section (EWS) | General | 169.00626 | WL-Economically Weaker Section (EWS)-GEN-2 | Economically Weaker Section (EWS)-GEN | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |
| 3 | 230 | AKSHAY ANIL THORAT | Male | Schedule Cast (SC) | General | 165.39291 | WL-Schedule Cast (SC)-GEN-1 | Schedule Cast (SC)-GEN | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |
| 4 | 364 | TEJASHREE RAJENDRA PATIL | Female | Open (Unreserved) | Female | 161.96242 | WL-Open-LDS-10 | Open-LDS | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |
| 5 | 391 | VAISHALI RAGHUNATH SANAP | Female | Nomadic Tribe - D (NT - D) | Female | 161.5465 | WL-Open-LDS-11 / WL-Nomadic Tribe - D (NT - D)-LDS-2 | Open-LDS | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगांव |
| 6 | 498 | RAJSHREE SURESH SONAWANE | Female | Special Backward Class (SBC) | Female | 159.01935 | WL-Special Backward Class (SBC)-LDS-1 | Special Backward Class (SBC)-LDS | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 550 | MAHENDRA BHASKARRAO KUMAWAT | Male | Nomadic Tribe - B (NT - B) | General | 158.14583 | WL-Nomadic Tribe - B (NT - B)-GEN-4 | Nomadic Tribe - B (NT - B)-GEN | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |
| 8 | 1197 | RAJENDRA PANDHARINATH VETHEKAR | Male | Other Backward Class (OBC) | Ex-Sevicemen | 148.67309 | WL-Open-EX-9 | Open-EX | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |
| 9 | 1200 | PRAMOD PRABHAKAR PATIL | Male | Other Backward Class (OBC) | Ex-Sevicemen | 148.67309 | WL-Open-EX-10 | Open-EX | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगांव |
| 10 | 1388 | KISHOR ASHOK DATE | Male | Other Backward Class (OBC) | Ex-Sevicemen | 146.56771 | WL-Other Backward Class (OBC)-EX-6 | Other Backward Class (OBC)-EX | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगांव |

(प्र. रा. पाटील)
सदस्य
समन्वय समिती तथा
अधीक्षक अभियंता (दरवाजे)
मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व
परिमंडळीय अधिकारी, नाशिक परिमंडळ,
नाशिक

# महाराष्ट्र शासन
## जलसंपदा विभाग
### समन्वय समिती
### गट-ब (अराजपत्रित) व गट-क सरळसेवा भरती २०२३
प्रपत्र-२

**सरळसेवा भरती सन २०२३ मधील नियुक्तिसाठी शिफारस करण्यात आलेल्या परंतु कागदपत्रे पडताळणीसाठी हजर न राहिलेल्या / नियुक्ति नाकारत असलेबाबत निवेदन वा राजीनामा सादर केलेल्या / नियुक्ति रद्द करण्यात आलेले उमेदवारांचे ऐवजी प्रतीक्षाधीन यादीतुन नियुक्त करावयाचे उमेदवारांची मंडळ निहाय यादी**

(नाशिक परिमंडळ कार्यालयाचे पत्र जा.क्र.मसंसं(द)/परि/प्रलि/२६८ /२०२५ दि.०८.०५.२०२५ चे सहपत्र)

**परिमंडळाचे नांव :- अधीक्षक अभियंता (दरवाजे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व परिमंडळीय अधिकारी, नाशिक.**

**पदाचे नांव :- कालवा निरीक्षक (Canal Inspector)**

| Sr. No | Merit No | Candidate Full Name | Gender | Reservation caste category | Claimed Horizontal Reservation | Marks Obtained | Waiting Category | Selection Category | Recommended Circle |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 108 | SUMIT BALAJIRAO SHANKURWAR | Male | Special Backward Class (SBC) | General | 170.3512 | WL-Special Backward Class (SBC)-GEN-4 | Special Backward Class (SBC)-GEN | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |
| 2 | 350 | VRUSHALI PRABHAKAR GARJE | Female | Nomadic Tribe - D (NT - D) | Female | 162.7649 | WL-Open-LDS-9 / WL-Nomadic Tribe - D (NT - D)-LDS-1 | Open-LDS | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |
| 3 | 419 | ARUN KISAN MORE | Male | Schedule Tribe (ST) | General | 161.13453 | WL-Schedule Tribe (ST)-GEN-6 | Schedule Tribe (ST)-GEN | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |
| 4 | 439 | NAVNATH AMBADAS SATPUTE | Male | Schedule Tribe (ST) | General | 160.68444 | WL-Schedule Tribe (ST)-GEN-7 | Schedule Tribe (ST)-GEN | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |
| 5 | 543 | AJAY SANJAY GAWALI | Male | Nomadic Tribe - B (NT - B) | General | 158.60399 | WL-Nomadic Tribe - B (NT - B)-GEN-3 | Nomadic Tribe - B (NT - B)-GEN | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगांव |
| 6 | 940 | LALITA PRALHAD KHADE | Female | Schedule Tribe (ST) | Female | 152.36263 | WL-Schedule Tribe (ST)-LDS-2 | Schedule Tribe (ST)-LDS | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |
| 7 | 1026 | ONKAR RAMESH DIWATE | Male | Open (Unreserved) | Ex-Sevicemen | 150.77847 | WL-Open-EX-8 | Open-EX | अधीक्षक अभियता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 1160 | PAWAN KUMAR DEORE | Male | Other Backward Class (OBC) | Sportsperson | 149.37926 | WL-Open-SP-3 | Open-SP | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |
| 9 | 1287 | RAOSAHEB BABAN GHORPADE | Male | Other Backward Class (OBC) | Ex-Sevicemen | 148.08407 | WL-Open-EX-12 / WL-Other Backward Class (OBC)-GEN-5 | Other Backward Class (OBC)-EX | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक |
| 10 | 2268 | SUNIL BAJIRAO GAIKWAD | Male | Economically Weaker Section (EWS) | Ex-Sevicemen | 138.14618 | WL-Economically Weaker Section (EWS)-EX-3 | Economically Weaker Section (EWS)-EX | अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगांव |

(प्र. रा. पाटील)
सदस्य
समन्वय समिती तथा
अधीक्षक अभियंता (दरवाजे)
मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व
परिमंडळीय अधिकारी, नाशिक परिमंडळ,
नाशिक